RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८६

दि.२४ जुलै २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# सहकाराची नवी क्रांती 'भारत टॅक्सी'मुळे प्रवासी आणि चालकांसाठी प्रवासाचा नवा अध्याय - मुख्यमंत्री फडणवीस

## आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात भारत टॅक्सी सेवेचा शुभारंभ

**नवी मुंबई :** सहकाराची नवी क्रांती 'भारत टॅक्सी'मुळे प्रवासी आणि चालकांसाठी प्रवासाचा नवा अध्याय असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली देशात सुरू झालेली ही सहकार क्षेत्रातील भारत टॅक्सी मॉडेल संकल्पना प्रवाशांना रास्त भाड्यात सुरक्षित प्रवास देणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात आज केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष सोहळ्यात 'भारत टॅक्सी' सेवेचा अधिकृत शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या सेवा शुभारंभ सोहळ्यास केंद्रीय राज्यमंत्री (सहकार आणि नागरी विमान वाहतूक, भारत सरकार) मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदाताई म्हात्रे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य दिपक तावरे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर, ठाणे महानगर पालिकेचे आयुक्त सौरभ राव, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभागाचे आदिनाथ दगडे, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, लोकनेते दि. बा. पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त परिवहन सहाकारी संस्थेचे सदस्य रामशेठ ठाकूर, सहकार टॅक्सी को-ऑप. लि. चे चेअरमन डॉ. जयेन मेहता, रुपेश धुमाळे आदि मान्यवर उपस्थित होते.




नवी मुंबई विमानतळावर आगमन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करुन मानवंदना दिली.

एकाच मोबाईल ॲपद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी सेवा उपलब्ध

यាप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ओला आणि उबरसारख्या खासगी ॲग्रीगेटर्सनी आजवर वाहतूक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. मात्र, सण-उत्सव किंवा पावसाच्या काळात प्रचंड भाडेवाढ करून सर्वसामान्य प्रवाशांची होणारी लूट आणि चालकांवर लादले जाणारे अवाजवी कमिशन या दोन्ही गोष्टींमुळे प्रवासी व चालक दोन्ही अडचणीत येत होते. या पार्श्वभूमीवर भारत टॅक्सीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राच्या ताकदीवर एक अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि स्वस्त पर्याय उभा राहिला आहे. एकाच मोबाईल ॲपद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी अशा तिन्ही प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, मध्यस्थांची साखळी मोडीत काढून थेट चालक आणि प्रवाशाला जोडणारी ही क्रांती ठरेल. पहिल्या दीड किलोमीटरसाठी केवळ ३१ रुपये आणि त्यानंतर प्रति किलोमीटर २१ रुपये असा काळी-पिवळी टॅक्सीच्या धर्तीवर निश्चित केलेला सुटसुटीत दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारा आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

नवी मुंबई विमानतळ परिसरातील स्थानिक आणि प्रकल्पबाधितांच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, या नव्या वाहतूक व्यवस्थेमुळे या भागातील भूमिपुत्रांना आणि तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. डिजिटल स्वाक्षरीसह राज्य सरकारने ॲग्रीगेटर धोरणाची चौकट आखून दिली असून, संपूर्ण आर्थिक व्यवहारांवर सहकार विभागाचे नियंत्रण असणार आहे. पहिल्या टप्प्यात ६०० टॅक्सींचे अनावरण करण्यात आले असून आगामी काळात १००० पेक्षा जास्त टॅक्सींचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमधून या सेवेचा पहिला टप्पा सुरू होत असून, आगामी काळात ही सेवा महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवून प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुखद अनुभव देण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय राज्यमंत्री (सहकार आणि नागरी विमान वाहतूक, भारत सरकार) मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'सहकार टॅक्सी' संस्थेमुळे चालक आता कर्मचारी न राहता थेट सभासद व मालक बनले आहेत. संस्थेच्या नफ्याचा लाभांश (डिव्हिडंड) आता थेट चालकांच्या खात्यात जमा होणार आहे. देशभरातून सुमारे ८ लाख चालक या संस्थेशी जोडले गेले असून, अल्पावधीत ७७ कोटी रुपये कोणत्याही कमिशनशिवाय थेट चालकांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. दिल्ली आणि गाझियाबादपाठोपाठ आज मुंबई महानगरात ही सेवा सुरू झाली असून, लवकरच पुणे आणि नागपूर येथेही तिचा विस्तार केला जाईल.

महाराष्ट्रातील सहकाराला बळकटी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली साखर कारखान्यांना १०,००० कोटी रुपयांची मदत मिळाली असून, संस्थांच्या डिजिटायझेशनसाठी २,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. 'सहकारातून समृद्धी' या अभियानात राज्यातील सर्व चालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

बेरोजगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार मंत्री बाबासाहेब पाटील

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर 'भारत टॅक्सी' सेवेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी, सहकार हे केवळ संस्था चालवण्याचे माध्यम नसून सर्वसामान्य माणसाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. 'भारत टॅक्सी'च्या माध्यमातून डिजिटल बुकिंग, पारदर्शक व्यवहार आणि सुरक्षिततेसोबत प्रवाशांना परवडणाऱ्या दरात प्रवास उपलब्ध होणार असून, विमानतळावरून मुंबईत जाणाऱ्या प्रवाशांना या सेवेचा मोठा दिलासा मिळेल. तसेच या उपक्रमामुळे हजारो बेरोजगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होऊन चालकांना सन्मानाचे उत्पन्न मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत त्यांनी सांगितले, सहकार क्षेत्राच्या बळावर राज्याला दारिद्र्यमुक्त करणे आणि देशाला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे नेणे शक्य होईल. सोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू झालेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचेही त्यांनी स्वागत केले.

यावेळी सहकार टॅक्सी को-ऑप. लि. आणि शासन यांच्यात सामजस्य करार करण्यात आला. तसेच यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सचिन साळुंखे, सीमा संतोष देवगिरीकर, आनंदराव पावस्कर, संतोष सिंग, हितेश मणिलाल दांड या भारत टॅक्सी सारथींना प्रतिनिधीक स्वरुपात शेअर प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच अक्षय विठ्ठल कीर्ती, नीरज बळीराम नाईक, तुषार पद्माकर पाटील, दिलीप लक्ष्मण पाटील, विलास कर्वे, सुदर्शन बालकृष्ण म्हात्रे, रोहिदास गायकवाड आणि प्रदीप नारायण म्हात्रे या सारथ्यांना किटचे वाटप करण्यात आले.

'भारत टॅक्सी'च्या भव्य शुभारंभाप्रसंगी प्रास्ताविक करताना प्रवीण दराडे यांनी हा उपक्रम 'सहकारातून समृद्धी' या राष्ट्रीय संकल्पनेला नवी दिशा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे सांगितले. पूर्वी केवळ कृषी व दुग्ध व्यवसायापुरता मर्यादित असलेला सहकार आता डिजिटल अर्थव्यवस्था आणि आधुनिक गतिशीलतेच्या ( ) क्षेत्रात एक प्रभावी शक्ती म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार स्थापन झालेल्या केंद्रीय सहकार मंत्रालय आणि केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीमुळे सहकार क्षेत्र 'आत्मनिर्भर भारत' घडवण्याचे मुख्य माध्यम बनले आहे. भारत टॅक्सीच्या माध्यमातून तंत्रज्ञान आणि सहकाराचा संगम साधून हजारो लहान व्यावसायिकांना व चालकांना मालकी हक्क, सामाजिक सुरक्षा, प्रतिष्ठा आणि आर्थिक समृद्धीचा नवीन मार्ग प्रशस्त झाला आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# 'लातूर भूषण पुरस्कार सोहळा २०२५-२६'च्या उद्घाटनाचे निमंत्रण पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्वीकारले

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**लातूर/ प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 'लातूर भूषण पुरस्कार सोहळा २०२५-२६' या कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे निमंत्रण राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्वीकारले.



यावेळी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेऊन पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रण दिले. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते, जिल्हा संघटक सुधाकर फुले, शहराध्यक्ष महादेव डोंबे, इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रमुख हारुण मोमीन, डिजिटल जिल्हाध्यक्ष मनीष हजारे, रेणापूर तालुकाध्यक्ष शरद राठोड, अमर करकरे, दयानंद राठोड, सुधाकर जाधव आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

'लातूर भूषण पुरस्कार' हा लातूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, या सोहळ्याच्या उद्घाटनासाठी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी निमंत्रण स्वीकारल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# माजी मंत्री, आ.अमित देशमुख यांची विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरील काँग्रेसचा कँडल मार्च आज

**लातूर/ प्रतिनिधी:** देशातील वाढती हुकूमशाही, विद्यार्थ्यांवर होणारे अन्याय आणि नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज (दि. २३ जुलै) आयोजित करण्यात आलेला छात्रों की गूंज... विद्यार्थ्यांचा एल्गार कँडल मार्च आजच्या लातूर बंदमुळे एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. आता हे जनआंदोलन आज , शुक्रवार दिनांक २४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होईल, अशी माहिती लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी दिली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या लातूर बंदला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. या बंदच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाची तीव्रता कायम ठेवण्यासाठी आजचा नियोजित कँडल मार्च आज (२४ जुलै) काढण्यात येणार आहे. अभय साळुंके यांनी याबाबत माहिती देताना केंद्र सरकारवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, देशात सध्या अराजकता माजली असून विद्यार्थ्यांवर अमानुष अत्याचार सुरू आहेत.

नीट पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यायला हवा; मात्र तसे न होता हे निर्दयी सरकार हुकूमशाही पद्धतीने राज्य करत आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना ज्या पद्धतीने लक्ष्य केले गेले आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांचे आंदोलन ज्या दडपशाहीने मोडून काढण्याचा प्रयत्न झाला, तो लोकशाहीचा अपमान आहे.

या हुकूमशाही, देशद्रोही आणि विद्यार्थीद्रोही सरकारचा आम्ही तीव्र धिक्कार करतो.

आज सायंकाळी ६ वाजता निघणार कँडल मार्च

आज , २४ जुलै रोजी सायंकाळी ६:०० वाजता अष्टविनायक मंदिर (उद्योग भवन, ट्युशन एरिया) येथून सुरू होईल आणि हुतात्मा स्मारक (शहीद स्मारक, क्रीडा संकुल) येथे त्याचा समारोप होईल. या आंदोलनात विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि त्यांच्या भावनांना बळ देण्यासाठी राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख स्वतः सहभागी होऊन रस्त्यावर उतरणार आहेत, अशी माहितीही साळुंके यांनी दिली.

नागरिकांना सहभागाचे आवाहन

शिक्षणव्यवस्थेतील पेपरफुटी रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पुकारण्यात आलेल्या या जनआंदोलनात लातूर शहरातील सर्व विद्यार्थी, युवक, पालक आणि नागरिकांनी उद्या हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटी, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस आणि एन.एस.यू.आय. च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# विरारमध्ये वंचितचे आंदोलन; पोलिसांकडून कार्यकर्त्यांची धरपकड

**वसई/ प्रतिनिधी:** दल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार मध्येही वंचित बहुजन विकास आघाडी कडून निषेध आंदोलन सुरू केले आहे. विरार पूर्वेच्या भागात आंदोलन सुरू असताना काही आंदोलकांना विरार पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्ली येथील जंतर मंतर येथे मागील काही दिवसांपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. मात्र शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू असतानाच दिल्ली पोलिसांकडून विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठीचार्ज करण्यात आला.

या घडलेल्या प्रकारानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विविध राजकीय पक्ष , सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरीक यांच्या मार्फत देशभर निदर्शने व मोर्चे काढून आंदोलने केली जात आहेत.

# लातूर-रेणापूर-धर्मापुरी बस सेवेचा आ. कराड यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर, रेणापूर, पानगाव, धर्मापुरी या मार्गावर नव्याने सुरू करण्यात आलेल्या बससेवेचा भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते २२ जूलै रोजी रेणापूर येथे करण्यात आला असून या सेवेमुळे रेणापूर, पानगाव परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

गेल्या अनेक दिवसापासून लातूरहून धर्मापुरीकडे जाणारी बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी सातत्याने नागरिकातून केली जात होती. रेणापूर, पानगाव या भागातील जनतेला परळी अहमदपूर गंगाखेड जाण्यासाठी अडचणी येत होत्या. प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधितांना सूचना केल्याने सदरील लातूर, रेणापूर, पानगाव, धर्मापुरी या मार्गावर नव्याने बस सेवा सुरु करण्यात आली आहे.

या बस सेवेचा शुभारंभ रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराज महाराजस्व अभियानाच्या निमित्ताने लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, जिप महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे, पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, तहसीलदार प्रशांत थोरात, सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, महादेव साळुंखे, सुरज शिंदे, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, अभिषेक अकनगिरे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुकेश भंडारे, राजकिरण साठे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, अच्युत कातळे, महेश गाडे, राजू आलापूरे, उत्तम चव्हाण, महादेव घुले, श्रीमंत नागरगोजे, बाबासाहेब भिसे एसटी



महामंडळाचे अधिकारी चालक वाहक यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

### 'क्यूडेंगा' या लसीला भारतात मंजुरी

डेंग्यू, मलेरिया, फ्लू हे पूर्वी पावसाळ्यात डोके वर काढणारे आजार हल्ली वर्षभरात कधीही उद्भवतात. यांपैकी डेंग्यूच्या आजारावरील 'क्यूडेंगा' या लसीला नुकतीच भारतात मंजुरी मिळाली. एक मच्छर आदमी को...' हा 'यशवंत' (१९९६) चित्रपटातील नाना पाटेकरचा सुप्रसिद्ध संवाद. आता त्या संवादातील 'फिल्मीपणा' जरी बाजूला ठेवला, तरी डासांमुळे उद्भवणार्या आरोग्याच्या समस्या या भारतासाठी सर्वस्वी गंभीर अशाच. कारण, भारत हा उष्णकटिबंधीय प्रदेशातील देश असल्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भावही तुलनेने अधिक. म्हणूनच, जगातील एक तृतीयांश डेंग्यूचे रुग्ण हे एकट्या भारतात आढळतात. त्यामुळेच डेंग्यूवरील नवीन 'क्यूडेंगा' ही लस लाखो भारतीयांना जीवनदान देणारी ठरू शकते. सर्वप्रथम डेंग्यूच्या प्रादुर्भावाची कारणे थोडक्यात समजून घेऊया. डेंग्यूचा प्रादुर्भाव हा 'एडीस इजिप्ती' नामक मादी डासाच्या दंशामुळे होतो. हे डास प्रामुख्याने साचलेल्या पाण्यात अंडी घालतात. घरामधील कुलर, कुंड्या, फ्रीजच्या खालील ट्रे किंवा घराबाहेर कचर्यात पडलेले डबे, नारळाच्या करवंट्या यांमध्ये साचलेले पाणी ही या डासांच्या उत्पत्तीसाठी अत्यंत पोषक ठिकाणे. डेंग्यूच्या तापाची लक्षणे हा डास चावल्यानंतर लगेचच नाही, तर साधारणपणे चार ते दहा दिवसांनी दिसू लागतात. यामध्ये तीव्र ताप, डोकेदुखी, सांधे आणि स्नायुदुखी आणि अंगावर पुरळ उठणे ही मुख्य लक्षणे आढळतात. त्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घरात किंवा घराबाहेर पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे, पालिकेकडून वेळोवेळी होणारी धूरफवारणी हे काही खबरदारीचे उपाय. पण, आपल्याकडील स्वच्छतेबाबतची एकूणच अनास्था लक्षात घेता, भारतात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या ही चिंताजनक आहे. १९९६ साली डेंग्यूच्या साथीत तब्बल ५४५ रुग्णांना प्राण गमवावे लागले होते, तर अलीकडच्या आकडेवारीवर नजर टाकली असता; २०२४ साली एकूण २ लाख, ३३ हजार डेंग्यूच्या रुग्णांपैकी ३०० जण मृत्युमुखी पडले, २०२५ साली हीच रुग्णसंख्या घटून १ लाख, २२ हजारांवर आली असली; तरी १३० रुग्णांना प्राण गमवावे लागले. २०२६च्या प्रारंभी फेब्रुवारीपर्यंत डेंग्यूची रुग्णसंख्या सात हजारांपर्यंत पोहोचल्याचे अधिकृत आकडेवारी सांगते. त्यामुळे 'क्यूडेंगा'च्या नवीन लसीमुळे निश्र्चितच डेंग्यूमुळे होणारे मृत्यू रोखण्यात यश मिळणार आहे. 'ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया' अर्थात, 'डीसीजीआय'ने 'ताकेदा बायोफार्मास्युटिकल' कंपनीच्या 'क्यूडेंगा' या लसीला भारतात नुकतीच मान्यता दिली. यापूर्वी, युरोपियन युनियनसह ब्राझील, अर्जेंटिनासारख्या ४० देशांमध्ये ही लस परिणामकारक ठरली असून, 'जागतिक आरोग्य संघटने'नेही प्रमाणित केली आहे. ही लस डेंग्यूच्या चारही प्रकारांवर परिणामकारक ठरणार असून, वयवर्षे ४ ते ६० पर्यंत नागरिकांना ही लस घेता येईल. विशेष म्हणजे, डेंग्यूबाधितांनीच ही लस घेतली पाहिजे किंवा लस घेण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी, असेही अजिबात नाही. 'क्यूडेंगा' लसीचे दोन डोस उपलब्ध असून, पहिला डोस घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या अंतराने दुसरा डोस नागरिकांना घेता येईल. परंतु, गरोदर महिला आणि 'इम्युनोरिस्पॉनसिव्ह' प्रकारची ज्यांची औषधे सुरू आहेत, अशांनी ही लस घेऊ नये, असे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात. या लसीच्या किमतीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आली नसून, लसीचे मूल्य आणि एकूणच वितरण कार्यक्रमाविषयी आगामी काळात स्पष्टता येईल. परंतु, डेंग्यूची लस टोचून घेतली म्हणजे या आजारापासून आजीवन संरक्षणकवच मिळाले, अशा भ्रमात राहण्याचे काहीएक कारण नाही. ही लस १०० टक्के डेंग्यूपासून सुरक्षा प्रदान करणारी नसून, डेंग्यूच्या लक्षणांमध्ये ८० टक्के; तर डेंग्यूमुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्याचा दर हा ९० टक्क्यांनी कमी होणार आहे. शिवाय, या लसीचा परिणाम साधारण साडेचार वर्षांपर्यंत कायम राहणार असल्याचेही समजते. त्याचबरोबर संबंधित रुग्णाच्या रोगप्रतिकारक शक्तीवरदेखील लसीची परिणामकारकता अवलंबून आहेच. याचाच अर्थ, ही लस सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होणार असली, तरी डेंग्यूपासून खबरदारीच्या उपाययोजनांना गत्यंतर नाही. पूर्वी डेंग्यूचा धोका हा मुख्यत्वे मान्सूनच्या कालावधीपुरता मर्यादित होता. परंतु, जागतिक हवामानबदलामुळे कोलमडलेले एकूणच निसर्गचक्र पाहता, डेंग्यू हा आता केवळ पावसाळी आजार राहिलेला नाही. वर्षभरही त्याचा प्रादुर्भाव देशाच्या अगदी कानाकोपर्यांत पाहायला मिळतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे, पावसाळ्यात ठिकठिकाणी लगेच निचरा न झाल्यामुळे साचणारे पाणी आणि उष्ण दिवसांचा कालावधी वाढल्याने डेंग्यूच्या डासांचा प्रजनन कालावधीही वाढला. त्यामुळे नवीन लस बाजारात दाखल होणार असली, तरी डेंग्यूविरोधी लढण्यासाठी आरोग्य यंत्रणांना सज्ज राहावे लागेल. तसेच, या लसीच्या अनुषंगाने आरोग्यसंबंधित पायाभूत सुविधांमध्येही बदल करणे, हे क्रमप्राप्त. सहसा लसीकरणाचे कार्यक्रम हे राष्ट्रीय स्तरावर एकसमान निश्र्चित कालावधीत राबविले जातात. परंतु, लसीकरणाचा विचार करताना देशातील सर्वाधिक डेंग्यू रुग्णसंख्या आढळणार्या जिल्ह्यांना प्राधान्यक्रम दिल्यास, त्याचे निश्र्चितच सकारात्मक परिणाम दिसून येतील. म्हणजेच, लसीकरणाच्या कार्यक्रमाचे केंद्रीकरण नाही, तर विकेंद्रीकरण करणे ही काळाची गरज म्हणावी लागेल. एकूणच काय, तर डेंग्यूचा सामना करण्यासाठी केवळ 'क्यूडेंगा' ही लस हा एकमेव शाश्र्वत उपाय असू शकत नाही. लसीकरणाच्या कार्यक्रमाबरोबरच गावांपासून ते शहरांतील पर्जन्यजलाचे सुयोग्य व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, त्यानुसार शहर नियोजनात, आराखड्यांमध्ये ठोस बदल, पर्जन्यमापनाची अचूक नोंद, तसेच ठिकठिकाणी डासांच्या घनतेच्या माहितीचे संकलन, यांसारख्या सर्वंकष उपाययोजनांवर स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेषत्वाने भर द्यावा लागेल. सामाजिक जनजागृती, अचूक निदान, जलद वैद्यकीय मदत आणि डासांच्या संख्येवर नियंत्रण या चतु:सूत्रीचा अवलंब केल्यास डेंग्यूचा प्रादुर्भाव निश्र्चितच कमी होण्यास मदत होईल. पण, ही केवळ सरकारची अथवा प्रशासकीय जबाबदारी न मानता, सर्वसामान्य नागरिकांनीही डेंग्यूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी खबरदारी घेणे तितकेच क्रमप्राप्त. यामध्ये प्रामुख्याने आपल्या घरात, आसपासच्या परिसरात पाणी साचणार नाही याची काळजी घेण्याबरोबरच, डासांना दूर ठेवण्यासाठी क्रीम, पूर्ण बाह्यांचे कपडे, मच्छरदाणीचा झोपताना वापर यांसारखे उपायही डेंग्यूला दूर ठेवू शकतात. आपले घर-अंगण कितीही स्वच्छ असले, पण आसपासचा परिसर कचर्याचे ढीग, दुर्गंधी आणि सांडपाण्याने दूषित असेल, तरी डेंग्यूच्या प्रादुर्भावाची शक्यताही साहजिकच वाढते. त्यामुळे डेंग्यूचा धोका टाळण्यासाठी स्वत:च्या, आपल्या कुटुंबाच्या आरोग्यरक्षणासाठी आपला परिसरही स्वच्छ राखणे, याबाबत सजगता ही दाखवायलाच हवी!

# दिल्ली प्रोटेस्ट : आंदोलनाचा आवाज दाबणार की प्रश्न सोडवणार?

## विद्यार्थ्यांचा आक्रोश, जंतर-मंतरवरील संघर्ष आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची खरी वेळ

















देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. मात्र जेव्हा स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते, कथित पेपरफ ुटी आणि गैरप्रकारांच्या बातम्या समोर येतात, तेव्हा केवळ एक परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडत नाही तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्याची चिंता हादरते. दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेले सीजेपीचे आंदोलन याच अस्वस्थतेचे प्रतिबिंब म्हणून पाहिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न सरळ आहे की मेहनत, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाला न्याय मिळणार आहे की पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर ते पुन्हा पराभूत होणार? या आंदोलनाला वेगळे नैतिक आणि सामाजिक परिमाण मिळाले ते सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देत त्यांनी उपोषण केले. प्रकृती खालावल्यानंतर त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले, तरी आंदोलनाचा आवाज थांबला नाही. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली. २० जुलै रोजी संसदेकडे 'चलो संसद' मोर्चाची हाक देण्यात आली आणि त्यानंतर दिल्लीतील आंदोलनाने राष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधून घेतले. लोकशाहीत आंदोलन करणे हा संविधानिक अधिकार आहे. शासनाच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट, जनतेच्या प्रश्नांकडे सत्तेचे लक्ष वेधण्याचे आंदोलन हे लोकशाहीतील एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे प्रश्न असा आहे की, आंदोलनाचा आवाज दाबायचा की त्या आवाजामागील वेदना समजून घ्यायच्या?

२० जुलै रोजी जंतर-मंतर आणि संसद परिसराकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. आंदोलक आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये तणाव निर्माण झाला. पोलिसांनी अश्रुधुराचा वापर आणि लाठीचार्ज केल्याचे वृत्त आले, तर काही ठिकाणी आंदोलकांकडून दगडफेकीचे आरोपही झाले. या घटनांनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. जर आंदोलकांनी कायदा मोडला असेल, तर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे पण पोलिसांकडूनही मर्यादा ओलांडल्या गेल्या असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत कायदा सर्वांसाठी समान असतो, आंदोलकांसाठीही आणि प्रशासनासाठीही. २० जुलैच्या घटनांनंतरही आंदोलन थांबले नाही. उलट, जंतर-मंतरवरील संघर्ष अधिक तीव्र झाला. २२ जुलैला आंदोलनस्थळ पुन्हा सक्रिय झाल्याचे वृत्त आले आणि २३ जुलैपर्यंतही सीजेपी आंदोलन सुरूच आहे. दरम्यान केंद्र सरकारने चर्चेची तयारी दर्शविल्याचे वृत्त आहे, मात्र आंदोलकांनी सरकारच्या प्रतिसादाला अपुरे मानत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी कायम ठेवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका व्यक्त केली असली, तरी आंदोलकांचा प्रश्न केवळ दोषींना शिक्षा देण्यापुरता मर्यादित नाही; त्यांना उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि भविष्यातील परीक्षांची विश्वासार्हता याची हमी हवी आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची कसोटी न राहता पैशांची आणि संपर्कांची स्पर्धा झाली, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण झाली तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असतील. एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे नुकसान नाही, त्यामागे एका कुटुंबाची आर्थिक गुंतवणूक, पालकांची स्वप्ने आणि विद्यार्थ्याची मानसिक झुंज असते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, न्यायाधीश आणि लोकप्रतिनिधी आजच्या वर्गखोल्यांमध्ये घडत आहेत. त्यामुळे त्यांच्या मनातील विश्वास तुटणे म्हणजे देशाच्या भविष्याच्या पायाभरणीतच तडे जाणे होय. या आंदोलनाला विविध राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तींकडून पाठिंबा मिळत असल्याचे वृत्त आहे. मात्र आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्यातील मूळ प्रश्न गौण ठरत नाही. उलट, सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकीय आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर हाताळला पाहिजे. हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा नसून, प्रत्येक पालकाचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे.

मात्र या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. कोणत्याही तपासाआधी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही. पेपरफुटी किंवा गैरप्रकाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते वितरण, परीक्षा केंद्र आणि निकालापर्यंतची संपूर्ण व्यवस्था अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र देखरेख यंत्रणा आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद या उपाययोजना तातडीने करण्याची आवश्यकता आहे. दरम्यान, २३ जुलैच्या घडामोडींमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आहे. दिल्ली पोलिसांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अधिकार विस्ताराचा आदेश सीजेपी आंदोलनाशी संबंधित नसून नियमित प्रशासकीय नूतनीकरण असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा संवेदनशील काळात सोशल मीडिया पोस्ट किंवा अपुष्ट दाव्यांपेक्षा अधिकृत माहिती आणि तथ्यांवर विश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आंदोलनाच्या नावाखाली हिंसा करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाजही ऐकला गेला पाहिजे.

आज आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे की, सरकार आणि आंदोलक यांच्यातील संवादाची दारे खरोखर उघडी आहेत का? सरकार चर्चेची तयारी दर्शवत असेल तर ती चर्चा प्रत्यक्षात झाली पाहिजे. आंदोलकांनीही संवादाची संधी नाकारता कामा नये. कारण लोकशाहीतील कोणताही संघर्ष शेवटी संवादाच्या टेबलावरच संपतो. रस्त्यावरचा संघर्ष जितका लांबतो, तितकी समाजातील अस्वस्थता वाढते. २० जुलैच्या घटनांनी देशासमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर पोलिसी बळाने मिळणार की संवादाने? आंदोलनकर्त्यांनी कायदा हातात घेऊ नये, हे जितके खरे आहे, तितकेच प्रशासनानेही संयम राखून कायद्याच्या चौकटीत वागणे आवश्यक आहे. सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते; तर विरोध ऐकून त्यावर योग्य उत्तर देण्यात असते.

आज २३ जुलैला दिल्लीतील आंदोलन एका निर्णायक वळणावर आहे. एका बाजूला सरकारकडून चर्चेची तयारी, दुसऱ्या बाजूला आंदोलकांच्या मागण्यांवरील ठाम भूमिका आणि तिसऱ्या बाजूला वाढता राजकीय हस्तक्षेप. या तिन्हींच्या छेदनबिंदूवर विद्यार्थ्यांचे भविष्य उभे आहे. दिल्ली उच्च न्यायालयात आंदोलनासंदर्भातील याचिकेवर सुनावणी होणार असल्याचेही वृत्त आहे. त्यामुळे आता या संघर्षाला कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने तोडगा काढण्याची जबाबदारी सर्व संबंधित घटकांवर आहे. या आंदोलनाचा शेवट कोणाच्या विजयाने किंवा पराभवाने होऊ नये, विजय झाला पाहिजे तो विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा. प्रश्नपत्रिका फुटली की केवळ एक परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर समान संधीचा घटनात्मक अधिकार जखमी होतो. एका विद्यार्थ्याची मेहनत जर पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर हरली, तर त्याचा पराभव केवळ त्या विद्यार्थ्याचा नसतो. तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा पराभव असतो. म्हणून प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रत्येक आरोपाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, दोषी कोणीही असो त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी अभेद्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उभी केली पाहिजे.



देशाला आंदोलनाची आग नको, तर न्यायाचा प्रकाश हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको तर विश्वास हवा आहे. सरकारला विरोध नको असेल, तर जनतेचे प्रश्न ऐकावे लागतील आणि विद्यार्थ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागू नये असे वाटत असेल, तर त्यांच्या भविष्याची हमी घोषणांमधून नव्हे, तर कृतीतून द्यावी लागेल. कारण राष्ट्राची खरी उभारणी केवळ संसद भवनाच्या भिंतींवर होत नाही तर ती उभी राहते विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील स्वप्नांवर, पालकांच्या विश्वासावर आणि गुणवत्तेला मिळणाऱ्या न्यायावर. आता वेळ आहे आंदोलनाचा आवाज दाबण्याची नव्हे, तर तो ऐकण्याची आश्वासन देण्याची नव्हे, तर उत्तरदायित्व स्वीकारण्याची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, देशाच्या भावी पिढीच्या भविष्याला न्याय देण्याची!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो. क्र. ९९२३६२०९१९**

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या केज बंदला व्यापारी व नागरिकांकडून प्रतिसाद

## विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष,व्यापाऱ्यासह विद्यार्थ्यांचा सहभाग

**केज/प्रतिनिधी :** नवी दिल्ली येथे जंतर-मंतर मैदानावर कॉकरोच पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके व ज्येष्ठ साहित्यिक संशोधक सोनम वांगचुक यांच्यासह विद्यार्थ्यांचे गेल्या अनेक दिवसापासून आंदोलन शांततेत सुरू असून लाखोच्या संख्येने विद्यार्थी हे आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततापूर्ण संविधानिक पद्धतीने शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलक, विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २३रोजी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले. ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत दिनांक २३ जुलै २०२६ केज शहरात शांततेत बंद पाळण्यात आला.

या बंदला सर्व संघटना,राजकीय पक्ष, व्यापारी, विद्यार्थी व नागरिक आणि ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देवून आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. गुरुवार रोजी सकाळी ११ ते ११-१५ वाजण्याच्या सुमारास शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पासुन







रॅली मंगळवार पेठ मार्गे मंगळवार पेठ कॉर्नर मार्गे मुख्य रस्त्याने कानडी चौक मार्गे कानडी रोड, परत याच मार्गाने राष्ट्रसंत भगवान बाबा चौक मार्गे मुख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी चौक मार्गे तहसील कार्यालय येथे रॅली काढण्यात आली या रॅलीमध्ये जय भीम, जय संविधान यासह इतर नाऱ्याने व घोषणांनी संपुर्ण केज दुमदुमून गेले होते. केज शहरातील व्यापाऱ्यांनी रॅलीमध्ये सहभागी होत स्वयंपूर्ण स्वतःचे व्यवसाय बंद करून सदरील बंद मध्ये सहभागी झाले होते.

रॅली तहसीलकार्यालया समोर पोहोचल्यानंतर सर्व संघटना डाव्या पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आंदोलनात सहभागी होऊन जाहीर पाठिंबा दिला.

व दिल्ली येथे जंतर मंतर येथे चालू असलेल्या आंदोलनात विद्यार्थ्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. वंचित बहुजन आघाडीचे व पाठिंबा दर्शविलेल्या सर्व संघटना आणि पक्षाचे निवेदन तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले.

लेखी दिलेल्या निवेदनात म्हटले की, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर बलप्रयोग करणे हा भारतीय लोकशाही, संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर आघात असून या घटनेची उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकाऱ्यांवर कठोरातील कठोर कारवाई करावी करण्यात यावी, विद्यार्थ्यांच्या न्याय्याच्या, मागण्या तातडीने मान्य करण्यात यावात, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, भविष्यात अशा घटना घडणार नाहीत.

याची शासनाने हमी द्यावी, त्याचबरोबर संपूर्ण घटनेची नैतिक व राजकीय जबाबदारी स्वीकारून पंतप्रधानांनीही राजीनामा द्यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

केज बंद च्या आंदोलनाला भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा व शहर शाखा, जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा नसरीन बानू बागवान, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य सरचिटणीस भाई मोहन गुंड, बहुजन विकास मोर्चाचे तालुकाध्यक्ष लखन हजारे,प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर, सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक हनुमंत भोसले यांच्यासह सर्व संघटना व डाव्या पक्षांच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा देऊन दिल्ली येथे जंतर मंतर मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनातील विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याचा जाहीर निषेध दर्शवून वरील मागणीस समर्थन दर्शविले. जर प्रशासनाने वरील मागण्या तात्काळ मंजूर न केल्यास यापुढे रस्त्यावर उतरून मोठे जन आंदोलन करण्यात येईल असा शासन प्रशासनाला इशारा देण्यात आला. या आंदोलन रॅलीमध्ये सर्व संघटना, डाव्या आघाडी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, व्यापारी, विद्यार्थी व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी त्याचबरोबर ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदरील मोर्चा रॅली हे शांततेत पार पडली या बंदसाठी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.सदरचा बंद आंदोलन यशस्वी पार पाडले. या अंदोलनाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या मोर्चा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## प्रा. चंद्रशेखर गायकवाड यांना वनस्पतीशास्त्र विषयात पीएच डी प्रदान

**केज/प्रतिनिधी :** शहरातील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्रा.चंद्रशेखर त्र्यंबक गायकवाड यांना,



जवळबन तलावातील शेवाळांची जैवविविधता व पाण्यातील विविध घटकांची परिणामकारकता (Algal flora and water quality analysis in Jawalban dam) या विषयावरील संशोधनास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांनी पीएचडी ही पदवी प्रदान केली. संशोधक मार्गदर्शक प्रो (डॉ.) नवनाथ काशीद, वनस्पतीशास्त्र विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, जिल्हा बीड यांनी मार्गदर्शन केले.

प्रा चंद्रशेखर गायकवाड यांच्या या यशाबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती अर्चनाताई रमेशराव आडसकर, अंबाजोगाई साखर कारखान्याचे चेअरमन श्री रमेशराव आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल किर्दत व सर्व शिक्षक शिक्षकेतर यांच्यासह माळेगाव येथील ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत अनंत भीमराव गोरेमाळी यांची ड्रग इन्स्पेक्टर पदी निवड

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील बनसारोळा गावचे सुपुत्र अनंत भीमराव गोरेमाळी यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत ड्रग इन्स्पेक्टर पदावर निवड झाल्याने गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



अनंत गोरेमाळी यांनी जिद्द, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून उच्च पदावर निवड होणे ही बनसारोळा गावासाठी अभिमानाची बाब मानली जात असून त्यांच्या यशामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अनंत गोरेमाळी यांच्या निवडीमुळे बनसारोळा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचा संपूर्ण केज तालुक्याला अभिमान वाटत आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्धा परीक्षांकडे आत्मविश्र्वासाने वाटचाल करावी, असा संदेशही या यशातून मिळत आहे.

## मुख्य सूत्रधाराला सीबीआय कडून क्लीन चिट!




**मुंबई :** देशभरात प्रचंड वादळ उठवणाऱ्या 'नीट २०२४' पेपरफुटी प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार आणि 'किंगपिन' संजीव कुमार उर्फ संजीव मुखियाला केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठा दिलासा दिला आहे. या पेपरफुटीच्या गुन्ह्यात संजीव मुखियाचा थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे कोणतेही पुरावे तपासात समोर आलेले नाहीत, असे स्पष्ट करत सीबीआय ने त्याला क्लीन चिट दिली आहे.

नेमके प्रकरण काय होते?

२०२४ मध्ये चा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा प्राथमिक तपास बिहार पोलिसांकडे होता. संजीव मुखिया यापूर्वीही इतर भरती परीक्षांच्या पेपरफुटी प्रकरणांमध्ये आरोपी राहिल्यामुळे, बिहार पोलिसांनी संशयावरून त्याला या प्रकरणात मुख्य आरोपी म्हणून इर्घी मध्ये नामनिर्देशित केले होते.

तथापि, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने हा तपास सीबीआय कडं सोपवला. सीबीआय ने संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करत प्रश्नपत्रिका चोरीपासून ती वाटण्यापर्यंतच्या प्रत्येक साखळीचा पर्दाफाश केला.

''आम्ही या कटातील प्रत्येक आरोपीची ओळख पटवली असून कोणीही कायद्याच्या तावडीतून सुटणार नाही याची खात्री केली आहे. परंतु, संजीव मुखियाविरुद्ध कोणतेही पुरावे न आढळल्याने त्याच्याविरोधात दोष-ारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही, निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जामीन मिळाला, तरी तुरुंगातच का?

तपासाच्या सुरुवातीच्या काळात संजीव मुखिया फरार झाला होता. नंतर बिहार पोलिसांनी त्याला अटक केली. ँघ ने या प्रकरणात त्याला कोठडीत घेऊन चौकशी केली, परंतु पुरावे न मिळाल्याने त्याच्यावर चार्जशीट दाखल झाली नाही. त्यामुळे या प्रकरणात त्याला जामीन मंजूर झाला. मात्र, ऱ्एऊ-ळउ प्रकरणात जामीन मिळालेला असला, तरी संजीव मुखिया सध्या तुरुंगातच राहणार आहे.

बिहार पोलिसांकडे नोंद असलेल्या इतर काही जुन्या पेपरफुटी प्रकरणांमध्ये तो आरोपी असल्याने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. ँघ च्या या खुलाशामुळे आता नीटऱ्युजी २०२४ पेपर लीक प्रकरणाच्या मूळ सूत्रधारांबाबत सुरू असलेल्या चर्चांना विराम मिळाला आहे.

## जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ धर्मेंद्र प्रधान, सदाभाऊ खोत यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

**बीड :** दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट परी-क्षा पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा तसंच आंदोलनकर्त्यांबाबत सदाभाऊ खोत यांनी 'दहशतवादी' संबोधून करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आज आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित या आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, सदाभाऊ खोत यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, दिल्ली पोलीस मुर्दाबाद, विद्यार्थ्यांवरील अत्याचार बंद करा' सदाभाऊ नव्हे हा तर भाडखाऊ' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.आंदोलनानंतर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल तसंच मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले.लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना, विद्यार्थ्यांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करून आपल्या मागण्या मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेला कथित लाठीमार हा लोकशाही मूल्यांवर आघात असून, या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. जंतरमंतर येथील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याची एसआयटीमार्फत चौकशी करावी.

## आसाममध्ये पुराचा हाहाकार : २४ तासांत १० जणांचा मृत्यू; शिवसागर आणि जोरहाटला सर्वाधिक फटका

दिसपूर : आसाममध्ये पावसाचा जोर ओसरण्याचे नाव घेत नसून पुराचे संकट दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. राज्यातील ११ जिल्हे सध्या या भीषण पुराच्या विळख्यात सापडले असून तब्बल ६.५ लाखांपेक्षा जास्त नागरिक यामुळे बाधित झाले आहेत. गेल्या २४ तासांत पुरामुळे आणखी १० जणांचा मृत्यू झाला असून, यामुळे या वर्षात आसाममध्ये पुरामुळे प्राण गमावलेल्यांची एकूण संख्या आता ४१ वर पोहोचली आहे.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (अएश्अ) दिलेल्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत शिवसागर आणि जोरहाट जिल्ह्यांत प्रत्येकी ३ जणांचा पुरामुळे मृत्यू झाला आहे. याशिवाय चराईदेव जिल्ह्यात २, तर कर्बी आंगलोंग आणि धेमाजी जिल्ह्यांत प्रत्येकी एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला आहे. सध्या शिवसागर जिल्ह्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला असून येथे सुमारे ४ लाख लोक बाधित झाले आहेत. याखालोखाल चराईदेवमध्ये १.११ लाख, तर जोरहाटमध्ये ९७ हजारांहून अधिक नागरिकांना पुराच्या भीषण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

भारतीय हवामान विभागाने (घ्श) दिलेल्या इशाऱ्यानुसार, येत्या काही दिवसांत राज्यात अजून मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे तूर्तास पूरपरिस्थितीतून सुटका होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन हवामान खात्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आव-ाहन करत 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तसेच पुढील चार दिवसांसाठी काही ठिकाणी वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाची शक्यता वर्तवत 'येलो अलर्ट'ही जारी करण्यात आला आहे.

# नवी दिल्लीतील 'मऱ्हाटी एम्पोरियम'चा कायापालट करणार मंत्री उदय सामंत

नवी दिल्ली दि. २३: येथील महाराष्ट्राच्या मऱ्हाटी एम्पोरियमचा सर्वसमावेशक विकास करून तेथे महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती व परंपरेचे प्रतिबिंब टिपणारे भव्य व आकर्षक दालन उभारण्यात येणार असल्याचे राज्याचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी सांगितले. मंत्री सामंत यांनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडच्या अखत्यारीत असलेल्या मऱ्हाटी एम्पोरियमला सदिच्छा भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि अधिकाऱ्यांसोबत सविस्तर आढावा बैठक घेतली.



यावेळी मार्गदर्शन करतांना मंत्री सामंत म्हणाले, नवी दिल्ली हे दे-शाचे केंद्रस्थान असून येथे जगभरातून पर्यटक आणि उद्योजक येतात. आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण कारागीर, महिला बचत गट आणि स्थानिक उद्योजकांच्या हाताला काम मिळून त्यांच्या कलागुणांना 'ग्लोबल प्लॅटफॉर्म' मिळणे आवश्यक आहे. या नूतनीकरणामुळे महाराष्ट्राची उत्पादने दिल्लीच्या मुख्य बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण करतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एम्पोरियमची पुनर्रचना करताना ते केवळ विक्री केंद्र न राहता, महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणारे 'अनुभूती केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करावा. तसेच या दालनाच्या माध्यमातून जगप्रसिद्ध पैठणी व हातमाग, कोल्हापुरी चप्पल, वारली पेंटिंग्स, हस्तकलेच्या वस्तू आणि महाराष्ट्राचे स्थानिक खाद्यपदार्थ (गृहउद्योग) एकाच छताखाली उप-लब्ध करून देण्याचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मंत्री सामंत यांनी दिल्लीतील काश्मीर, गुजरात बिहार या एम्पोरियम्सना भेट देऊन डिझाइन आणि विपणन पद्धतींबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडचे महाव्यवस्थापक संगीता वराडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, कंपनी सेक्रेटरी अक्षय पाठक यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# केज शहरातील भवानी चौकात भिषण अपघात!

## हायवा टिप्परने दुचाकीस्वाराला चिरडले;! शरीर छिन्नविछिन्न रक्त मासांचा चिखल! तुटलेले अवयव गोळा करुन भरले पोत्यात!

**केज/प्रतिनिधी :** केज शहरात अपघाताची मालिका सुरुच असुन शहरात अशा प्रकारचे अपघात रोज घडत असल्याचे पहावयास मिळत आहेत. याला अनेक गोष्टी जबाबदार असुन यामध्ये चौकाचौकात अतिक्रमणामुळे अरुंद रस्ते, वाहतुकीची कोंडी, वाहतुक पोलिसांचा अभाव , अवैद्य प्रवाशी वाहतूक , रस्त्यावर गतिरोधक नसने या गोष्टी कारणीभूत आहेत. केज शहरातील भवानी चौकात भिषण अपघात घडला असून हायवा टिप्परने दुचाकीस्वाराला चिरडले असून या अपघात शरीर छिन्नविछिन्न अवस्थेत घटनास्थळी पडलेले होते. सदरील घटनेमध्ये शरीराचे कमरेपासून हात पाय व इतर अवयव वेगळे पडलेले होते. दवाखान्यात नेताना शरीराच न राहिल्याने शरीराचे सर्व अवयव गोळा करुन पोत्यात भरण्यात आले. सदरील घटनेची माहिती हे शहरात व परिसरात कळतात सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. सदरील घटनेबाबत प्राथमिक मिळालेल्या माहितीवरून नितीन आदिनाथ चाटे रा. तांबवा वय ३५ वर्षे ता.केज असे मृत युवकाचे नाव असल्याचे समजले असुन दि. २३ जुलै गुरुवार रोजी केज शहरातील भवानी चौकात सकाळी ११ ते ११:३० वाजण्याच्या दरम्यान केज शहरातील भवानी चौकात हायवा टिप्पर क्रमांक एम एच४४-यु९९७४ व मोटार सायकल क्रमांक जी ए०३-एए८१२८ या हायवा टिप्पर आणि






दुचाकी यांच्या भीषण अपघातामध्ये दुचाकीवर असलेल्या नितीन चाटे या तरुणाला डस्टने भरलेल्या हायवा टिप्परने टायरखाली चिरडले असुन यामध्ये नितीन चाटे या तरुणाच्या शरीराचा अक्षरक्षाः चेंदामेंदा झाला असून त्याच्या शरीराचे झालेले तुकडे तुकडे यामध्ये पोटाचा भाग, कमरेचा भाग, दोन्ही पाय वेगवेगळे पडलेले होते. तर रक्त आणि मासाचा चिखल झालेला पहावयास मिळाला. हि घटना एवढी भयानक होती की पहाणऱ्यांना आपले आश्रु आवरता आले नाहीत. या घटनेमुळे केज तालुक्यासह तांबवा गावावर शोककळा पसरली असून या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेची अधिक माहिती व तपास केज पोलीस करत आहेत.

# रेणापूर येथील समाधान शिबिरात विविध योजनेतील अनेकांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण

## शासकीय योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये–आ. कराड

**लातूर/ प्रतिनिधी:** देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री विकासपुरुष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने अठरापगड जाती धर्मांना, गोरगरीब सर्वसामान्य माणसांला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजने पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिराचे आयोजन केले असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे रेणापूर येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भुमीअभिलेख जिल्हा अधीक्षक नसीम पटेल, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, लातूरचे सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, पद्माकर चिंचोलकर, मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ता समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, संगायो समितीचे रेणापूर तालुका अध्यक्ष सतीश आंबेकर, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, भागवत सोट, अभिषेक आकनगिरे, अनिल भिसे, बालाजी गोटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या समाधान शिबिर प्रसंगी विविध गावचे लोकप्रतिनिधी, लाभार्थी, महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा देऊन स्वर्गीय अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या नेतृत्वात देशाने आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने विकास कामात एक वेगळी उंची गाठली असून त्यांनी सुरू केलेल्या विविध जनकल्याणकारी योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी समाधान शिबिराचा निश्चितपणे फायदा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आत्तापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली असून याचा ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तर महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात येत्या दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही प्रत्येक शेतकऱ्यांना मजबूत आणि पक्का रस्ता देण्याचे काम शासनाच्या वतीने हाती घेण्यात आले असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.




गावागावात शिव रस्त्याची कामे करताना कोणीही कोणाचीही आडवणूक करू नये असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी आडवणूक करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने एकही शेतरस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे होतील. कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही. पात्र लाभार्थ्यांचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे काम थांबणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे आणि संदीप कुलकर्णी यांनी एकाच छताखाली शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान निधी, मोफत वीज पुरवठा, सोलर पंप, लाडकी बहीण, मोफत राशन, घरकुल, विहिरी, लखपती दीदी योजना यासह सर्व योजनाचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची समाधान शिबिराच्या माध्यमातून सोय करण्यात आली असल्याची माहिती दिली. प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समाधान शिबिर आयोजनामागची भूमिका विषद करून या शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

रेणापूर येथील समाधान शिबिरात महिला शेतकरी प्रमाणपत्र, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे, ट्रॅक्टर वाटप, सांगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, बचत गटांना कर्जमुक्ती प्रमाणपत्र, बेबी केअर किट यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी तहसीलदार प्रशांत थोरात यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास भाजपाचे महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे, सुकेश भंडारे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, दिपक वांगस्कर, रुपेश काळे, अच्युत कातळे, वसंत करमुडे, राजकुमार आलापुरे, सुरेश बुड्डे, श्रीमंत नागरगोजे, महेश गाडे, उत्तम चव्हाण, महादेव घुले नायब तहसीलदार तानाजी यादव, अशोक सोनकांबळे, प्रतीक्षा लांडगे, गणेश सरवदे यांच्यासह रेणापूर, लातूर तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी अनेक गावातील नागरिक, महिला पुरुष मोठ्या संख्येने होते. कार्यक्रम स्थळी आगमन होताच आ. कराड यांचे शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझीम आणि विविध वाजंत्रीच्या गजरात जोरदार स्वागत केले.

## विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या प्रतीकात्मक अंत्ययात्रेचे आयोजन – अक्षय धावारे

**लातूर/ प्रतिनिधी:** NEET परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री मा. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्ली येथील जंतर-मंतरवर देशभरातील विद्यार्थी आंदोलन करत आहेत. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या



घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी भीम आर्मी भारत एकता मिशन, लातूर जिल्ह्याच्या वतीने दि. २५ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता गंज गोलाई ते गांधी चौक, लातूर या मार्गावर केंद्रीय शिक्षण मंत्री मा. धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतीकात्मक अंत्ययात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्लीतील आंदोलनात भीम आर्मीचे संस्थापक तथा आजाद समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि खासदार भाई चंद्रशेखर आझाद यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा देशभरातून निषेध व्यक्त होत असून, या पार्श्र्वभूमीवर भीम आर्मीने देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून लातूर येथे हे आंदोलन आयोजित करण्यात येत आहे. आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण, संविधानिक मार्गाने व कायद्याचे पालन करून करण्यात येणार असून, जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक, सामाजिक कार्यकर्ते व संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन भिम आर्मी चे राज्य सचिव अक्षय धावारे यांनी केले आहे

## लातूर येथे २७ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

### महसूल सेवा, आरोग्य शिबीर, विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी

**लातूर/ प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्यभरात २२ जुलै २०२६ ते ०२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी लातूर येथील पार्वती मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये एकाच ठिकाणी नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा एक खिडकी प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणार असून, यामध्ये सातबारा व फेरफार दुरुस्ती, डिजिटल सातबारा सेवा, विविध प्रकारची दाखले व प्रमाणपत्रे वितरण, महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, फार्मर आयडी, महिलांचे नाव अधिकार अभिलेखात समाविष्ट करणे, पात्र निवासी अतिक्रमणे नियमितीकरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनांबाबत मार्गदर्शन, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, शिधापत्रिका वितरण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ व मार्गदर्शन प्रत्यक्ष उपलब्ध करून दिले जाईल.

महसूल सेवांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी मोफत सर्वसमावेशक आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून, यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत डोळ्यांची तपासणी, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब, महिलांचे आरोग्य, हाडांचे आजार, कर्करोगाबाबत प्राथमिक तपासणी व मार्गदर्शन, रक्त तपासणी तसेच आवश्यक आरोग्यविषयक सल्ला मोफत दिला जाणार आहे. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शिबिरात हरितोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून विविध प्रकारच्या फळझाडांची व उपयुक्त वृक्षांची रोपे नागरिकांना उपलब्ध करून देऊन वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

तसेच महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला व बालकल्याण योजनांची माहिती व लाभ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून (एस.टी. महामंडळ) सवलत योजना व प्रवासी कल्याण योजनांबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. या शिबिरात विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करतील. तरी लातूर शहर मतदारसंघातील सर्व नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी लातूर, श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

## संततधार पावसामुळे गोदावरीला पूर, नाशिक जिल्ह्यातील नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

नाशिक : जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे. अशात काही प्रमाणात नाशिककरांचे जनजीवन विस्कळीत झालं आहे.गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्यानं गंगापूर धरणातून हजारो क्युसेस पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत होत आहे. त्यामुळे गोदावरी नदीला पूर आला आहे. त्यामुळे रामकुंड परिसरातील लहान मोठे मंदिर पाण्याखाली गेली आहेत. प्रशासनाच्या वतीनं नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाचा जोर वाढल्यास विसर्ग वाढवला जाईल- नाशिक जिल्ह्यात गेल्या दोन जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळेच जिल्ह्यातील सर्वच धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्यानं गंगापूर धरणातून आज सकाळी आठ वाजल्यापासून गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. सकाळी आठ वाजल्यापासून ३ हजार १६५ क्युसेस वेगानं सुरू असलेला विसर्ग सकाळी साडेदहा वाजता ५ हजार २९५ क्युसेसनं वाढवला आहे.

## तरुणी थेट भिडली; आंदोलकांना घेऊन जाल तर खबरदार; पोलिस व्हॅनच्यासमोर थांबली अन्...

**मुंबई / प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपर फुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळाविरोधात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाचे तीव्र पडसाद आता मुंबईतही उमटू लागले आहेत. दिल्लीतील आंदोलनाच्या समर्थनार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बुधवारी मुंबईतील विविध भागांत विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली.

बुधवारी चेंबूर आणि दादर परिसरात मोठ्या संख्येने विद्यार्थी एकत्र आले होते. चेंबूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी करणारे पोस्टर्स हातात घेऊन आंदोलन केले. या आंदोलकांना पोलिसांनी स्थानबद्ध करून ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला. दुसरीकडे, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्क येथेही मोर्चा काढून जोरदार निदर्शने केली. या ठिकाणी पोहोचून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. ''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांच्या या लढ्यात मनसे त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील,'' अशी ग्वाही राज ठाकरे यांनी यावेळी आंदोलकांना दिली. या संपूर्ण आंदोलनादरम्यान मुंबईच्या रस्त्यावर 'जेन-झी पॉवर'चा (उाह-ै इ्दै) एक थक्क करणारा प्रकार पाहायला मिळाला. दादरच्या शिवाजी पार्कजवळ पोलीस स्थानबद्ध केलेल्या आंदोलक विद्यार्थ्यांना व्हॅनमध्ये बसवून नेण्याचा प्रयत्न करत होते. त्याच वेळी हुडी आणि कॅप घातलेली रिया अहीर ही तरुणी मुसळधार पावसात थेट पोलिसांच्या व्हॅनसमोर जाऊन उभी राहिली. एका हाताने गाडी थांबवत तिने पोलिसांची व्हॅन पुढे जाऊच दिली नाही. तिच्या या धाडसाची आणि संघर्षाची दृश्ये कॅमेऱ्यात कैद झाली असून, एका तरुणीने एकटीने पोलीस गाडी रोखून धरल्याचा हा व्हिडिओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत.

इंटरनेटवर सध्या रिया अहीरची 'मुंबई की सुपरगर्ल' म्हणून जोरदार चर्चा सुरू आहे. रिपोर्टनुसार, रिया अहीरच्या या धाडसी पावलामुळे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या काही आंदोलक सहकाऱ्यांना सोडवून घेण्यास मदत झाली. रिया अहीर ही अभिनेत्री, मॉडेल आणि एंटरप्रेन्योर (उद्योजक) आहे. ती अनेक प्रसिद्ध म्युझिक व्हिडिओंमध्ये झळकली असून, अलीकडेच आलेले तिचे 'दिलबरा' हे गाणे खूप चर्चेत राहिले होते. मनोरंजन विश्वाव्यतिरिक्त रिया 'रियासत' नावाचा स्वत:चा पर्सनलाइज्ड क्लोथिंग ब्रँड चालवते; जिथे ती स्वत: कपडे डिझाइन आणि हँडक्राफ्ट करते. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर तिचे १ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत.

आपल्या या कृत्याबद्दल बोलताना रिया म्हणाली, ''मला समजते की पोलीस त्यांचे काम करत आहेत, पण ते जबाबदारीने काम करत नाहीत. जर ते जबाबदारीने वागणार नसतील, तर एक नागरिक म्हणून आपल्याला आपल्या लोकांची जबाबदारी घ्यावीच लागेल.''

पुढे बोलताना ती म्हणाली, ''मी शेतकरी नाही किंवा दलित नाही, पण दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांसोबत जे घडले ते पूर्णपणे चुकीचे होते. आम्ही मुंबईत बसून दिल्लीच्या जंतर-मंतरवर जाऊ शकत नाही. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे आणि स्वत: जंतर-मंतरवर जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे.''

## अण्णा हजारे यांचे अहिल्या नगरमध्ये मौन आंदोलन

**अहिल्यानगर :** दिल्लीमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आज, गुरुवारी नगर शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या आवारात असलेल्या महात्मा गांधी पुतळ्याजवळ आंदोलन सुरू केले आहे. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व तरुण उपस्थित होते. यावेळी त्यांनी तिरंगा ध्वज उंचावत आंदोलनात सहभाग घेतला. अण्णा हजारे सहा वर्षानंतर मौन आंदोलन केले आहे. यापूर्वी सन २०१९ मध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राळेगणसिद्धी येथे मौन आंदोलन केले होते. काही दिवसांपूर्वी माहिती अधिकार कायद्याच्या नियमावलीमध्ये राज्य सरकारने जाचक बदल केले याकडे लक्ष वेधत त्या नियमावली मागे घ्याव्यात या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता.

# सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; आलमला येथे २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमांतर्गत जनजागृती सत्र उत्साहात

**लातूर/ प्रतिनिधी:** राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल, आलमला येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीतील २०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्र्न विचारून सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंची माहिती जाणून घेतली.


यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर तसेच मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना संबंधित पकडून मागितल्या जाणाऱ्या परवानग्यांचा विचार करणे आवश्यक असून, अनावश्यक परवानग्या देणे टाळावे, याबाबतही विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले. त्याचबरोबर ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या लिंकपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर आणि डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्र्न विचारले. त्यामुळे सत्र अधिक प्रभावी आणि उपयुक्त ठरले.

कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती कापसे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सुप्रिया जाधव मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, तसेच सायबर फसवणुकीपासून स्वतः



सह कुटुंबीय आणि समाजाचे संरक्षण करण्यासाठी सायबर सुरक्षेबाबत अधिकाधिक जागरूकता निर्माण करावी, असे आवाहन करण्यात आले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पीग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.